वाचले:-

१)अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, वाय.सी.एम.एच.रुग्णालय यांचे पत्र क्रमांक वायसीएमएच/3/कावि/2064/2024. दिनांक 27/12/2024.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1).

३) अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/1/कावि/1175/2013.दिनांक 29/08/2013

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - 411018.
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक: साप्रवि/5/कावि/25/2025
दिनांक : 06/03/2025

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तिबाबत.......
श्री. लांडगे तुकाराम नाथोबा, पदनाम -वॉर्ड बॉय,( संगणक क्रमांक 4976 )

आदेश,

श्री. लांडगे तुकाराम नाथोबा हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील वॉर्ड बॉय या गट ड मधील पदावर वाय.सी.एम.एच.3 विभाग येथे काम करीत आहेत. दिनांक 01/01/1995 रोजी ते म.न.पा.मध्ये वॉर्ड बॉय पदावर रूजू झाले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख 01/04/1965 अशी असून दिनांक 31/03/2025 रोजी त्यांच्या वयास 60 वर्ष पूर्ण होत आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1) नुसार गट ड मधील कर्मचा-यांना वयाची 60 वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, वाय.सी.एम.एच.रुग्णालय,यांनी दिनांक 27/12/2024 रोजीच्या पत्रान्वये, श्री. लांडगे तुकाराम नाथोबा, वॉर्ड बॉय यांचेकडून म.न.पा.चे वाहन कर्ज, संगणक कर्ज, घरदुरुस्ती कर्ज, घरबांधणी कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज व वैद्यकीय अग्रीम येणे बाकी नाही तसेच 1337 दिवस विनावेतनी केल्याचे दिसुन येत आहे. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून,त्यांना दिनांक 31/03/2025 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी,वाय.सी.एम.एच.रुग्णालय,यांचेकडील दिनांक 27/12/2024 रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक 3 वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री. लांडगे तुकाराम नाथोबा, वॉर्ड बॉय यांना दिनांक 31/03/2025 रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्री.लांडगे तुकाराम नाथोबा, वॉर्ड बॉय यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता सबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे.लेखा विभागाने श्री. लांडगे तुकाराम नाथोबा, वॉर्ड बॉय यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज;वाहन कर्ज, संगणक कर्ज, वैद्यकीय अग्रीम,इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय?या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास , ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री. लांडगे तुकाराम नाथोबा पदनाम -वॉर्ड बॉय यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - 411018.

प्रति,
श्री. लांडगे तुकाराम नाथोबा,
पदनाम-वॉर्ड बॉय
वैद्यकीय मुख्य कार्यालय विभाग,

प्रत :- 1) लेखा विभाग 2) मुख्य लेखापरिक्षण 3) वैयक्तिक नोंद कक्ष 4) गोपनिय अहवाल कक्ष 5) सेवाज्येष्ठता कक्ष 6) मागासवर्ग कक्ष 7) संगणक कक्ष - सामान्य प्रशासन 8) विद्युत विभाग 9) दूरसंचार विभाग 10) कामगार कल्याण विभाग 11) पि. चि. म. न. पा. कर्मचारी महासंघ 12) पि. चि. म. न. पा. सह. पतसंस्था
13) वाय.सी.एम.एच.रुग्णालय

2/- सोबत श्री. लांडगे तुकाराम नाथोबा पदनाम -वॉर्ड बॉय यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.